# "सार्वजनिक शौचालय यशोगाथा"

ग्रामपंचायतीचे नाव :- बनाचीवाडी
तालुका :- राधानगरी
कुटुंब संख्या :- ३३४
सार्वजनिक शौचालय बांधकाम वर्ष:- २०२२

ग्रामपंचायत बनाचीवाडी, तालुका राधानगरी ही ग्रामपंचायत हागणदारी मुक्त (ODF) आहे. ग्रामपंचायती पासुन 2 किलो मीटर अंतरावर भैरीबाबर हे गाव आहे . या गावात भैरीमंदिर हे धार्मीकस्थळ असनु याठिकाणी भावीकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते . परगावाहुन येणा-या लोकांना याठिकाणी शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे , भावीकांची गैर सोय होत होती . त्यामुळे याठिकाणी सार्वजनिक शौचालयाची (CSC)आवश्यकता भासली.

भैरीमंदिर या ठिकाणी सार्वजनिक शौचालय (CSC) बांधकाम करणेचा ग्रामपंचायतींने निर्णय घेतला. सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी स्वच्छ भारतमिशन ग्रा . टप्पा -2 अंतर्गत व 15 वा वित्त आयोगातुन एकूण रक्कम रु . 3,06,000/- इतका खर्च झाला आहे . सार्वजनिक शौचालय (CSC) बांधकाम करण्याच्या ठिकाणाची लोकसहभागातुन स्वच्छता करण्यात आली.

भैरीमंदिर येथे आठवडयातुन दर मंगळवारी आणि शुक्रवारी साधारण 250 ते 300 इतके भाविक याठिकाणी भेट देत असतात. या शौचालयाचा वापर परगावाहुन आलेले भाविक व गावातील नागरीक करीत आहेत . विशेषत: महिला वर्गाला या सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामामुळे सोय झाली आहे. यामुळे या सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता शाश्वत राखणेस मदत होत आहे.

सार्वजनिक शौचालयाची देखभाल दुरुस्ती ही देवस्थान समिती व ग्रामपंचायत यांच्या मार्फत केली जात आहे. सदर शौचायात महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र युनिट बांधण्यात आली आहेत . तसेच दिव्यांग व्यक्तीसाठी स्वतंत्र व्यवस्था करणेत आली आहे . याठिकाणी पाण्याची व हातधुण्याची व्यवस्था करणेत आली आहे.

या ठिकाणी पाणी पुरवठा करणेसाठी 500 मिटर अंतरावरुन, झ-यावरील स्त्रोतातुन सायपन पध्दतीने पाईप टाकुन पाणी आणण्यात आले आहे . शौचालयात वीज पुरवठयाची व्यवस्था करणेत आली आहे. ग्रामपंचायती मार्फत Pay and Use पध्दत वापरली जात नाही लोकांना मोफत सुविधा दिली जाते.

सार्वजनिक शौचालयाचे उत्कृष्ट पध्दतीचे फोटो.










सार्वजनिक शौचालयाचे उत्कृष्ट पध्दतीचे फोटो.




